# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:03.07.2026** **वार:शुक्रवार**

---

1. भारत-जपान आर्थिक भागीदारीच्या यशाची अनेक उत्कृष्ट उदाहरणं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. भारत आणि जपानकडून सर्व प्रकारच्या दहशतवादाचा तीव्र निषेध
3. अमरनाथ यात्रेला आज सकाळी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम आणि बालताल या दोन्ही मार्गांवरून सुरुवात
4. पंचायती राज मंत्र्यांची आज नवी दिल्लीत राष्ट्रीय कार्यशाळा आणि
5. महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर बहुमान देणारे महाराष्ट्र देशातील पहिलं राज्य, महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक विधानसभेत मंजूर

**भारत-जपान संयुक्त निवेदन**

भारत-जपान संबंध अत्यंत विशेष आहेत आणि या आर्थिक भागीदारीच्या यशाची अनेक उत्कृष्ट उदाहरणे आहेत, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संध्याकाळी नवी दिल्ली इथं भारत-जपान संयुक्त आर्थिक मंचाला संबोधित करताना केलं. जपानचे कौशल्य आणि गुंतवणूक यांचा भारताची गती आणि व्याप्ती यांच्याशी संगम होतो, तेव्हा संपूर्ण जगाला त्याचा लाभ होतो. ही भागीदारी अधिक गतिमान आणि सखोल करण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतल्याचंही त्यांनी सांगितलं.

**भारत-जपान-आर्थिक सहकार्य**

भारत आणि जपाननं विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारीच्या मूलभूत स्तंभांपैकी एक असलेल्या 'आर्थिक सुरक्षे'च्या महत्त्वाबाबतची आपली सामायिक कटिबद्धता संयुक्त जाहीरनाम्यात अधोरेखित केली आहे. ही भागीदारी परस्पर विश्वास, सामायिक मूल्यं आणि समान हितसंबंधांवर आधारित असून, दोन्ही देशांची समृद्धी, सुरक्षा आणि आर्थिक भवितव्य एकमेकांशी जोडलेलं असल्याचं यात नमूद केलं आहे. सेमीकंडक्टर, महत्त्वपूर्ण खनिजं, माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान, स्वच्छ ऊर्जा आणि औषधनिर्माण या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट होईल, असंही दोन्ही देशांनी म्हटलं आहे.

**भारत-जपान-दहशतवाद**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानच्या पंतप्रधान सानाए ताकाइची यांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेच्या संयुक्त निवेदनात, दोन्ही नेत्यांनी गेल्या वर्षी 22 एप्रिल रोजी पहलगाम इथं झालेल्या आणि गेल्या वर्षी 10 नोव्हेंबर रोजी दिल्लीत झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचा कठोर शब्दांत निषेध केला. त्यांनी 'द रेझिस्टन्स फ्रंट'चा उल्लेख करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या अहवालाचाही उल्लेख केला. अल-कायदा, लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि त्यांच्याशी संबंधित गटांसह संयुक्त राष्ट्रांनी दहशतवादी म्हणून घोषित केलेल्या सर्व गट आणि संस्थांविरुद्ध एकत्रित कारवाई करण्याचं आवाहन त्यांनी केलं. हिंदी-प्रशांत क्षेत्राला लवचिक आणि समृद्ध बनवण्याच्या सामायिक उद्दिष्टासाठी समान विचारसरणीच्या देशांमधील सहकार्य वाढवण्याबाबतची आपली कटिबद्धता पुन्हा अधोरेखित केली.

**खामेनेइ-अंत्यसंस्कार**

इराणचे दिवंगत सर्वोच्च नेते अयातुल्ला सय्यद अली खामेनेइ यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्यासाठी बिहारचे राज्यपाल, निवृत्त लेफ्टनंट जनरल सय्यद अता हसनैन आणि परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री पवित्र मार्गेरिटा आज इराणला रवाना

होणार आहेत. भारतातील उच्च-स्तरीय शिष्टमंडळाची या अंत्यसंस्काराला उपस्थिती दोन्ही देशांमधील सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संबंधांचं महत्त्व अधोरेखित करते असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**ओमबिर्ला-कोलकाता**

लोकसभा सभापती ओम बिर्ला आज कोलकाता इथं पश्चिम बंगाल विधानसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांसाठी आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन करतील. नवनिर्वाचित सदस्यांना संसदीय आणि विधिमंडळ कामकाजाच्या विविध पैलूंशी परिचित करून देण्यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये 'एक प्रभावी लोकप्रतिनिधी कसे बनावे', तसेच सदस्यांसाठीच्या प्रथा, संकेत आणि शिष्टाचार यांसारख्या विषयांचा समावेश असेल. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश, केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**अमरनाथ यात्रा**

वार्षिक अमरनाथ यात्रेला आज सकाळी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम आणि बालताल या दोन्ही मार्गांवरून सुरुवात झाली. ही यात्रा 28 ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहे. दरम्यान, कडक सुरक्षा व्यवस्थेखाली, यात्रेकरूंची पहिली तुकडी काल नुनवान आणि बालताल इथल्या तळांवर पोहोचली. या पहिल्या तुकडीत 4822 भाविक आहेत; त्यापैकी 2510 भाविक पहलगाम मार्गानं तर 2312 भाविक बालताल मार्गानं प्रवास करत आहेत. यात्रा सुरळीत आणि सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी दोन्ही मार्गांवर कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, विश्रांतीची ठिकाणं, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, आरोग्य सेवा आणि बचाव पथकं आदी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**राष्ट्रीय कार्यशाळा**

सोळाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींवर चर्चा करण्यासाठी पंचायती राज मंत्रालयानं आज नवी दिल्ली इथं विविध राज्यांच्या पंचायती राज मंत्र्यांची राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली आहे. केंद्रीय पंचायती राज मंत्री राजीव रंजन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली आणि केंद्रीय राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल यांच्या उपस्थितीत ही कार्यशाळा पार पडेल. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या अनुदानाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर यावेळी चर्चा होणार आहे. पंचायती राज संस्थांनी स्वतःच्या स्रोतांतून महसूल वाढवून, आर्थिक स्वावलंबन क्षमता बळकट करण्यावर या कार्यशाळेत विशेष भर दिला जाईल. केंद्र आणि राज्य यांच्यातील सहकार्य अधिक दृढ होण्यास आणि 'विकसित भारत 2047' च्या संकल्पनेनुसार, उत्तम प्रशासन, पायाभूत सुविधा, सार्वजनिक सेवा आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकासासाठी पंचायतींना सक्षम करणारी एक भक्कम अंमलबजावणी यंत्रणा उभारण्यास या परिषदेमुळे मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

**महिला सक्षमीकरण विधेयक**

महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता, समान हक्क आणि शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळवून देणारे 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक 2026' काल विधानसभेत एकमतानं मंजूर करण्यात आलं. या विधेयकाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना प्रथमच स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख मिळणार असून, महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर बहुमान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

**भारत-श्रीलंका क्रिकेट दौरा**

भारत आणि श्रीलंका यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका पुढील महिन्याच्या 15 ते 27 ऑगस्ट दरम्यान होणार आहे. ही मालिका आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद 2025-27' या स्पर्धेचा भाग आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय पुरुष संघ सध्या जागतिक कसोटी अजिंक्यपद गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. श्रीलंका दौऱ्यापूर्वी, भारत यजमान इंग्लंडविरुद्धची सध्या सुरू असलेली पाच सामन्यांची टी-ट्वेंटी आंतरराष्ट्रीय मालिका पूर्ण करेल. त्यानंतर भारतीय संघ तीन सामन्यांच्या टी-ट्वेंटी आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी झिम्बाब्वेचा दौरा करेल. दरम्यान, यजमान इंग्लंडविरुद्धच्या पाच

सामन्यांच्या टी-20 आंतरराष्ट्रीय मालिकेतील पहिला सामना बुधवारी रात्री पावसामुळं रद्द करण्यात आला. दुसरा सामना उद्या मँचेस्टर इथं होणार आहे.

**आयसीसी महिला क्रिकेट**

आयसीसी महिला टी-ट्वेंटी विश्वचषकाची अंतिम लढत इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात रविवारी ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर होणार आहे. लंडनमध्ये काल झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात, यजमान इंग्लंडनं दक्षिण आफ्रिकेचा 40 धावांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

**फिफा विश्वचषक**

फिफा विश्वचषक स्पर्धेत काल कॅलिफोर्नियात झालेल्या 'राऊंड ऑफ 32' च्या सामन्यात स्पेननं ऑस्ट्रियाचा 3-0 असा पराभव करून 'राऊंड ऑफ 16' मध्ये धडक मारली.आता स्पेनचा सामना पोर्तुगाल किंवा क्रोएशियाशी होईल. याआधी बेल्जियम, अमेरिका आणि इंग्लंड यांनी 'राऊंड ऑफ 16' मध्ये प्रवेश केला आहे. 'राऊंड ऑफ 16' मध्ये इंग्लंडचा सामना सोमवारी मेक्सिकोशी होईल, तर अमेरिकेचा सामना मंगळवारी बेल्जियमशी होणार आहे. फ्रान्स, नॉर्वे, कॅनडा, मोरोक्को, ब्राझील आणि पॅराग्वे या संघांनीही 'राऊंड ऑफ 16' साठी पात्रता मिळवली आहे.

**पाऊस**

मान्सूननं आता दिल्ली, गुजरातचा आणखी काही भाग, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, हरियाणा, पंजाब आणि राजस्थानच्या काही भागांत आगेकूच केली असून, गुजरात, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, ओडिशा आणि पश्चिम मध्य प्रदेशात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. छत्तीसगड, कर्नाटक किनारपट्टी, केरळ, उत्तराखंडमध्येही मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**पाऊस इशारा-गिरीश महाजन**

महाराष्ट्रातही मुंबई ठाणे पुणे यासह विविध भागात दमदार पावसाला सुरुवात झाली असून गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागांत पाऊस सुरू आहे. काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे; पावसाळ्यात संभाव्य आपत्ती परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्यातील आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि सर्व जिल्ह्यांतील आपत्कालीन यंत्रणा पूर्णपणे सज्ज असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार